॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)


## :: परिपत्रक क्रमांक - ०३/२०२६ ::

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा. संचालक

**विषय:-** प्रजासत्ताक दिन समारंभ, सोमवार दिनांक २६ जानेवारी, २०२६ रोजी साजरा करणेबाबत...
**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. सीईआर-२०२६/प्र.क्र.०३./राशि- दि.२१ जानेवारी, २०२६.

*कृपया वरील संदर्भिय शासन परिपत्रकाचे अवलोकन व्हावे.*

दि.२६ जानेवारी, २०२६ रोजी प्रजासत्ताक दिन निमित्त ध्वजवंदनाचा मुख्य शासकीय समारंभ राज्यभर एकाच वेळी म्हणजे सकाळी ०९.१५ वाजता आयोजित करण्यात येणार आहे. तेव्हा, महाविद्यालयात अथवा संस्थेत ध्वजारोहण समारंभ करतांना त्यांनी तो सकाळी ८.३० वाजेच्या पुर्वी किंवा १०.०० वाजेच्या नंतर आयोजित करावा. तसेच संदर्भिय शासन परिपत्रकातील तंतोतंत पालन करण्यात यावे.

स्थानिक लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक, शहिद जवानांच्या पत्नींना व आई-वडिल यांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात यावे. दिवसभरातून विविध कार्यक्रम जसे:- वृक्षारोपण, आंतर शालेय/आंतर महाविद्यालय स्तरावर वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजूषा/देशभक्तीपर निबंध स्पर्धाचे आयोजन करावे. प्रभात फेऱ्या काढण्यात याव्यात. सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध खेळांचे आयोजन करण्यात यावे. महत्वाच्या योजनेचा शुभारंभ करावा, शासकीय इमारतीवर विद्युत रोषणाई करावी, एनएसएस व एनवायकेएस द्वारे देशभक्तीपर मोहिम राबविण्यात यावी, तसेच सोशल मिडिया व डिजिटल माध्यमाद्वारे देशभक्तीपर किंवा राष्ट्रीय एकात्मतेसंबंधातील गाण्यांचा प्रचार करावा/संदेश द्यावा, याप्रमाणे प्रजासत्ताक दिन साजरा करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी.

काही ठराविक जिल्हयांमध्ये निवडणूक आचारसंहिता अंमलात असल्यास संदर्भिय परिपत्रकांतील मुद्दा क्रं. १२ मध्ये दिलेल्या सूचना प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. विनोद प्र. पाटील)
**कुलसचिव**

**सोबत:** वरील प्रमाणे.
जा.क्र. कबचौउमवि/०३/सा.प्र./ ४८ /२०२६ दि. २२ /०१/२०२६

**प्रत महितीसाठी :**
१) मा. व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य व अधिष्ठाता, कबचौउमवि, जळगाव, २) मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव, ३) मा. प्र-कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, कबचौउमवि, जळगाव, ४) मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१, ५) मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव, ६) मा. प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमंडळ, कबचौउमवि, जळगाव, ७) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगांव


उमविनगर, जळगाव - ४२५००१ (महाराष्ट्र) भारत, दुरध्वनी क्र : ०२५७ - २२५७२५०, २२५७२४७
Umavinagar, Jalgaon - 425 001 (Maharashtra) INDIA, Telephone No. 0257 - 2257250, 2257247
Email : registrar@nmu.ac.in Web : www.nmu.ac.in